# जल समृद्धी (अर्थमूव्हर्स) व्याज अर्थसहाय्य योजना

| अ.क्र. | योजनेचे स्वरूप व कार्यपद्धती |
|---|---|
| १) | ➢ "जलसमृध्दी यंत्र सामुग्री" (अर्थमूव्हर्स) व्याज अर्थसहाय्य योजना शासन निर्णय दि.०२ जानेवारी, २०१८ अन्वये सुरू करण्यात आलेली आहे.<br>➢ राज्यात जलयुक्त शिवार अभियान / जल व मृद संधारणाची कामे करण्यासाठी यंत्र सामग्री उपलब्ध करण्याकरिता सुशिक्षीत बेरोजगार तरुण/बेरोजगाराची सहकारी संस्था / नोंदणीकृत गट शेती/शेतकरी उत्पादन संस्था / विविध कार्यकारी संस्था यांना शासनाकडून मृद व जलसंधारण विभाग, सहकार विभाग व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या माध्यमातून अर्थसहाय्यासाठी.<br>➢ नोडल एजन्सी - महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ<br>➢ प्रथम टप्यामध्ये या योजनेचा कालावधी दि.३१ मार्च २०१८ पर्यंत.<br>➢ योजनेस मिळणारा प्रतिसाद आणि राज्यात उपलब्ध होणाऱ्या यंत्रांची संख्या विचारात घेऊन या योजनेचा कालावधी वाढवण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.<br>➢ या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांना उत्ख यंत्रसामुग्री (अर्थमुव्हर्स) खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्थाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचे दायित्व शासनातर्फे अदा करण्यात येत आहे.<br>➢ लाभार्थी कर्ज मर्यादा कमाल रु.१७.६० लक्ष<br>➢ सदर कर्जावरील ५ वर्षाचे कमाल व्याज रु.५.९० लक्ष शासनामार्फत अदा करण्यात येत आहे.<br>➢ सदर योजना जिल्हास्तरावर जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे.<br>➢ पहिल्या टप्यात १००० यंत्रसामग्री वाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले प्रत्यक्षात ३१८ लाभार्थी पात्र ठरले आहेत. |

## लाभार्थी सद्यस्थिती

| अ.क्र. | वर्ष | लाभार्थी संख्या | वितरीत निधी |
|---|---|---|---|
| १) | २०२१-२२ | ३१८ | रु.४९०.१७ लक्ष |
| २) | २०२२-२३ | ३१८ | रु.२०५.८५ लक्ष |
| ३) | २०२३-२४ | ३१८ | रु.२०५.८२ लक्ष |

- सन २०२५-२६ करिता रु.४.०० कोटी तरतुद अर्थसंकल्पित